बुधवार, दि १२ नोव्हेंबर २०२५ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक १० वा ● किंमत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

## महाविकास आघाडीची 'एक्झिट'!

**दिल्ली -** बिहारमध्ये दुसऱ्या टप्प्याचे मतदान संपले आणि सत्तेच्या चाव्या कुणाकडे याचा फैसला मतपेठीत बंद झाला. १४ नोव्हेंबर रोजी याचा निकाल लागणार असून सगळ्याच पक्षांची, त्यांच्या उमेदवारांची धाकधूक वाढली आहे. अशात आता एक्झिट पोलचे आकडे समोर आले आहेत. त्यामध्ये सर्वच एक्झिट पोलनी भाजप प्रणित एनडीएला स्पष्ट बहुमत मिळणार अशी शक्यता वर्तवली आहे. तर तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील महागठबंधनला शंभरीही गाठता येणार नसल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

बिहारच्या निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यात ६४ टक्के तर दुसऱ्या टप्प्यात ६७.६६ टक्के इतकं मतदान झाल्याची माहिती आहे. एकूण किती मतदान झालं याची अधिकृत आकडेवारी अद्याप निवडणूक आयोगाने जाहीर केली नाही. पण गेल्या वेळच्या तुलनेत यंदा मतदानाच्या टक्केवारीमध्ये मोठी वाढ झाल्याचं दिसून येतंय. त्यामुळे त्याचा फटका कुणाला बसणार हे आता १४ नोव्हेंबर रोजीच स्पष्ट होणार आहे.

मॅट्रीज आयएएनएस एक्झिट पोलनुसार भाजपप्रणित एनडीएला सर्वाधिक जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

एनडीए - १४७-१६७, महागठबंधन - ७०-९०, इतर - २-६. चाणक्य एक्झिट पोलनुसार एनडीए - १३०-१३८, महागठबंधन - १००-१०८, इतर - ३-५. पोल डायरीच्या अंदाजानुसार एनडीए - १८४-२०९, महागठबंधन - ३२-४९, इतर - १-५. प्रजा पोलनुसार एनडीए - १८६, महागठबंधन - ५०, इतर - ७ पोलस्ट्राटच्या अंदाजानुसार, एनडीए - १३३-१४८, महागठबंधन - ८७-१०२, इतर - ३-५ टीआयएफ रीसर्च एक्झिट पोलनुसार एनडीएला १४५ ते १६३, महागठबंधनला ७६ ते ९५. जेव्हीसी एक्झिट पोल एनडीए १३५ ते १५० महागठबंधन शंभरच्या आसपास जागा जिंकू शकते असं म्हटलं आहे.

### जालना महानगर पालिका निवडणुक

## समाजवादी पार्टी सज्ज

### प्रभाग चार मधून उमेदवार ठरले

**जालना । प्रतिनिधी -** येत्या काही दिवसांतच जालना महानगर पालिकेच्या निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नुकतेच जालना महानगर पालिका निवडणुकीच्या अनुषंगाने प्रभाग निहाय आरक्षण घोषित करण्यात आले आहे.



या पार्श्वभुमीवर समाजवादी पार्टीकडून निवडणुक अनुषंगाने तातडीचे बैठक मंगळवार (दि ११) रोजी पक्षाचे जिल्हाध्यक्ष शेख नबी सिपोराकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यात प्रभाग चार मधील चारही उमेदवार ठरविण्यात आले असून ईतर प्रभागातील उमेदवारांची चाचपणी सुरु असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शेख नबी सिपोराकर यांनी माध्यमांशी बोलतांना दिली. ते म्हणाले समाजवादी पार्टी जालना महानगर पालिकेच्या सर्व जागांवर उमेदवार देणार असून विना पेट्रोलची सायकल यावेळी बुलेट ट्रेनच्या वेगाने धावणार आहे. समाजवादी पार्टी सक्रीय असलेले पदाधिकारी कार्यकर्त्यांची आगामी एक-दोन दिवसांत बैठक घेऊन ईतर प्रभागातील उमेदवारांची चाचपणी करुन लवकरच उमेदवारी घोषित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.



# संपादकीय

## पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली



आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली यांचा आज जन्मदिन आहे. पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली यांचा जन्म आजच्याच दिवशी म्हणजे १२ नोव्हेंबर १८९६ रोजी मुंबईत एका गरीब मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे पूर्ण नाव सलीम मोईनुद्दीन अब्दुल अली असे होते. सलीम अली हे एक वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे तर दोन वर्षाचे असताना आईचे निधन झाले. अगदी बालवयातच आई वडिलांचे छत्र हरपलेल्या सलीम अलींचा सांभाळ त्यांच्या मामांनी केला. सलीम अली यांना लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड होती. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी गळ्यावर पिवळा डाग असलेली चिमणी विकत घेतली होती. हा पक्षी कोणता आहे ? त्याचे नाव काय आहे ? हे त्यांना माहीत नव्हते म्हणून ते माहीत करून घेण्यासाठी ते त्या चिमणीला घेऊन मामांकडे गेले. मामांनी सरळ त्याला बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या संचालकाकडे घेऊन गेले. तिथे संचालकांनी सलीम अलींना त्या पक्षाची सविस्तर माहिती सांगितली तसेच संस्थेतील भुसा भरलेल्या पक्षांचा संग्रह दाखवला. तो क्षण डॉ सलीम अलींच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. त्या क्षणी त्यांच्यावर पक्षांची जी भुरळ पडली ती कायमचीच. त्यानंतर त्यांना पक्षी निरीक्षणाचा छंदच जडला. १९१३ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर डॉ सलीम अली यांनी सेंट झेव्हीयर महाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड असल्याने सलीम अली यांनी उच्च शिक्षणासाठी प्राणी विज्ञान हा विषय निवडला. या विषयात त्यांना बी ए ऑनर्स ही पदवी मिळवली मात्र ही पदवी विद्यापीठाच्या समकक्ष समजली जात नव्हती त्यामुळे त्यांना भारतीय प्राणी वैज्ञानिक सर्व्हेक्षण संस्थेत नोकरी मिळू शकली नाही मात्र बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीत त्यांना व्याख्यता म्हणून नोकरी मिळाली. त्यानंतर ते जर्मनीची राजधानी बर्लिनला गेले तेथे जाऊन त्यांनी पक्षी शास्त्रावर प्रशिक्षण घेतले तिथे त्यांना जगप्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ एर्विन ट्रेझमन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यानंतर काही काळ इंग्लंडमध्येही काम केले. १९३१ साली ते भारतात परत आले. परत आल्यावर त्यांनी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे उपकार्यवाहक पद स्वीकारले. नंतर ते या संस्थेचे अध्यक्षही बनले. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी हैदराबाद पक्षी निरीक्षण, त्रावणकोर - कोचीन पक्षी सर्व्हेक्षण, अफगाणिस्तान पक्षी सर्व्हेक्षण, कैलास पक्षी निरीक्षण यात्रा अशा मोहिमा राबवल्या. डॉ सलीम अली यांनी सुगरण पक्षाच्या वर्तनावर बारकाईने अभ्यास केला व त्यावर बिएनएचएस जर्नलमध्ये एक शोधनिबंध लिहिला. या शोध निबंधाने त्यांना पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मान्यता मिळवून दिली. डॉ सलीम अली यांनी भारतभर फिरून विविध पक्षांची तपशीलवार माहिती गोळा केली.ती माहिती त्यांनी सर्वसामान्य नागरिकांना समजावी यासाठी पुस्तक रुपात लिहिली. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ इंडिया अँड पाकिस्तान व पिक्टोरियल गाईड या दहा खंडीय पुस्तकाने त्यांचे जगभर नाव झाले. डॉ डीलन रीलपे यांच्या साथीत त्यांनी अपार मेहनत घेऊन भारतीय पक्षांच्या बाराशे जाती, २२०० उपजातींच्या नोंदी, सवयी, शास्त्रशुद्ध सर्वांगीण माहिती चित्रांसहित एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिली. डॉ सलीम अली यांच्या ह्याच कार्याने भारतात हौशी पक्षी निरीक्षक बनण्याची परंपरा निर्माण झाली. भारतातील पक्षी निरीक्षक डॉ सलीम अली यंन्स आद्य गुरू मानतात. त्यांच्या कार्याची नोंद घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला तसेच त्यांचा जन्मदिन पक्षीदिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. डॉ सलीम अली यांचे २७ जुलै १९८७ रोजी निधन झाले. डॉ सलीम अली यांना जन्मदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# मानवी जीवन एवढे स्वस्त नका समजू...

मित्रहो मानवाला मिळालेले जीवन हे निसर्गाची अनमोल देणगी आहे. निसर्ग हे माणसाला केवळ एकदाच जीवन देत असते. एकदा मिळालेले जीवन पुन्हा पुन्हा मिळत नाही. म्हणून मिळालेले जीवन हसत, खेळत आनंदाने व मजा करत जगावे. जीवनाला एवढे स्वस्त नका समजू. पैशाच्या जोरावर आपण काहीही खरेदी करू शकतो परंतु आई-वडील आणि जीवन खरेदी करू शकत नाही. एवढे अनमोल आईवडील आणि जीवन असते. आईवडील आणि जीवन हे निसर्गाची पुन्हा पुन्हा न मिळणारी अनमोल देणगी आहे. म्हणून प्रत्येकाने जीवनाचा भरभरून आनंद घेतला पाहिजे. जीवनात कितीही मोठे संकट येऊ द्या, लाख अडचणी येऊ द्या, अंगावर दुःखाचा पहाड कोसळू द्या नाहीतर डोक्यावर कर्जाचा डोंगर उभा राहू द्या पण अशा छाटछूट संकटांना न डगमगता व न खचून जाता त्यांचा हिंमतीने सामना करून आपल्या जीवनात सुखाचे व आनंदाचे क्षण मिळवता आले पाहिजेत. जीवनात दुःखानंतर सुखाचे व आनंदाचे क्षण येतात हे लक्षात घेतले पाहिजे. फक्त त्यासाठी थोडा संयम ठेवायला हवा. एक दिवस सर्व काही तुमच्या मनासारखे होईल परंतु त्यासाठी तुम्हाला काही दिवस निश्चित राहावे लागेल. मनाविरुद्ध काही झाले म्हणून घाबरून न जाता, आलेले दुःख व संकट पाहून खचून न जाता त्या संकटाला व अपयशाला पचवायची क्षमता आपल्या अंगी असली पाहिजे. त्यासाठी अपयशाला व दुःखाचा खंबीरपणे सामना करून जीवनात सुखाचे क्षण शोधता आले पाहिजेत. परंतु आलेल्या संकटाला व अपयशाला पचवायची क्षमता आजकाल माणसात राहिली नाही. माणूस हळव्या मनाचा व हलक्या काळजाचा झाला आहे. जीवनात आलेले अपयश हिंमतीने पचवायचे सोडून, आलेल्या दुःखाचा हिंमतीने सामना करायचा सोडून आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलण्याचे धाडस नका करू. दहावी बोर्ड परीक्षेत किंवा बारावी बोर्ड परीक्षेत अपयश आले म्हणून बरेच विद्यार्थी टोकाचे पाऊल उचलतात. स्पर्धा परीक्षेत एक दोन गुणांनी अपयश आले म्हणून बरेच विद्यार्थी जीवन संपवतात. वेळेवर लग्न जुळत नाही म्हणून किंवा मनासारखी मुलगी मिळत नाही म्हणून आत्महत्या करणारे महाभाग भरपूर आहेत. वडिलांनी मनासारखी गाडी घेऊन दिली नाही किंवा मनासारखा मोबाईल घेऊन दिला नाही म्हणून आत्महत्या करणारे युवक सुद्धा भरपूर आहेत. छाटछूट व लहानसहान गोष्टीवरून आत्महत्या करणाऱ्या युवकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. आई-वडिलांनी अपमानास्पद बोलले किंवा रागावले म्हणून आत्महत्या करणारे महाभाग भरपूर आहेत. लग्न करते म्हणून ऐनवेळी मुलीने धोका दिला किंवा मुलाने धोका दिला म्हणून आत्महत्या करणारे प्रेम वेडे युवक युवती सुद्धा भरपूर आहेत. यावरून असा निष्कर्ष निघतो की, आजकाल मरण फार सोपे झाले आहे. माणूस सहजपणे मरत आहे, मागचा पुढचा व घराबाळाचा विचार न करता स्वतःचे जीवन संपवून मोकळे होत आहे. लहानसहान गोष्टीवरून सुद्धा आत्महत्या केल्या जात आहेत. घरातील मुलीने आई वडिलांना न विचारता लव मॅरेज केले किंवा पत्नीने दुसऱ्या सोबत अनैतिक संबंध ठेवले म्हणून आत्महत्या करणारे लोक भरपूर आहेत. परंतु आत्महत्या करणे यावर उपाय होऊच शकत नाही. एक दिवस सगळ्यांनाच मरायचे आहे. नको नको म्हटले तरी मरण हे येणारच आहे. माणसाचे जीवन मरण हे अटळ आहे. स्वतःच्या हाताने स्वतःचे जीवन संपवण्यापेक्षा नैसर्गिक मृत्यू हा कधीही चांगला असतो. म्हणून जीवनात कितीही संकटे आले तरी डगमगू नका..दुःखाचा डोंगर कोसळला तरीही खचून जाऊ नका... जीवनात अपयश आले म्हणून टोकाचा निर्णय घेऊ नका... डोक्यावर कर्जाचा भार सहन होत नाही म्हणून आत्महत्येचा मार्ग अवलंबू नका.. जीवन फार सुंदर आहे ते आनंदाने व हसत खेळत जगा...जीवनात आलेल्या लहान सहान संकटाला, अपयशाला व दुःखाला घाबरून न जाता जिगरबाज बनून त्याचा सामना करा... दुःखानंतर सुखाची व सुखानंतर दुःखाची मंगलमय पहाट उगवतच असते त्यासाठी थोडा धीर धरावा लागतो..थोडा संयम ठेवल्याने सर्व काही मनासारखे होते. अपयशानंतर यशाची मंगलमय पहाट उगवतच असते म्हणून थोड्याफार अपयशाला घाबरून जीवनाचे वाटोळे करून घेऊ नका..जीवन एवढे स्वस्त नाही.. जे की ते पैशाच्या जोरावर विकत मिळेल..जो माणूस जीवनात आलेल्या संकटाला, दुखाला व अपयशाला सामोरे जाऊन जीवन पूर्णत्वास नेतो तो माणूस खरा नर असतो.. आणि तुम्ही जर लहानसहान संकटांना घाबरून जीवनाला अखेरचा रामराम ठोकत असाल तर तुमच्यात खरा पुरुषार्थ नाही असेच म्हणावे लागेल. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शिक्षणाचे महामेरू महात्मा ज्योतिबा फुले आणि साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे या महापुरुषांच्या जीवनात पदोपदी अडचणी येत राहिल्या...दुःख व संकट आवासून उभे टाकत राहिले परंतु त्यांनी आलेल्या संकटावर व दुःखावर हिंमतीने मात करत या देशात समतेची, ममतेची, मानवतेची व सुखाची मंगलमय पहाट आणली. आपणही या महापुरुषांची प्रेरणा घेऊन जीवनात हिंमतीने व निर्भीडपणे आलेल्या संकटांवर मात करून जीवन यशस्वीपणे जगावे...असे मला वाटते...

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी, ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# टेंभूर्णी येथे ३४ वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा कायम, भक्तांची गर्दी

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** आत्मानंद सरस्वती रंगनाथ महाराज यांच्या ११० व्या पुण्यतिथीनिमित्त टेंभूर्णी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने येथील खलसे गुरुजी यांच्या मळ्यातील रंगनाथ महाराज मंदिर परिसरात रोज भागवत कथा, काकडा, आरती, रंगनाथ महाराज चरित्र गाथा, भजन, प्रवचन, हरिपाठ व हरिकीर्तन आदी धार्मिक कार्यक्रम होत आहेत.

या सप्ताहाला सोमवारी प्रारंभझाला. दररोज रात्री ८ ते १० या वेळात

महाराज पिंपळे, बाळू महाराज नाईक, होणाऱ्या कीर्तनात निवृत्ती महाराज कोरडे, विठ्ठल महाराज जगताप, नारायण ज्ञानेश्वर झगरे गुरुजी, श्रीपाद मुळे महाराज, भगवान महाराज गाडेकर, रघुनाथ महाराज देशपांडे आदींची कीर्तन सेवा होणार आहे. शिवाय दुपारी अशोक जोशी, रघुराम उखर्डे, रवी महाराज, विनायक गुरू, राज गोविंद प्रभू, गोविंद दत्त प्रभू, डॉ. देवपती प्रभू आदींची प्रवचन सेवा होणार आहे.

रघुनाथ महाराज देशपांडे यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर सोमवारी महाप्रसादाने सांगता होणार आहे. या सप्ताहाचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सप्ताह कमिटीचे दगडुबा खलसे, गणपत भिताडे, राजू करवंदे आदींसह पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

११० व्या रंगनाथ महाराज यांची पुण्यतिथी व संत शिरोमणी ज्ञानेश्वर महाराज यांच्या समाधी सोहळ्यानिमित्ताने ३४ वर्षांपासून या ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन केले जाते.

संत रंगनाथ महाराज यांनी स्वतः आपल्या जीवनातील काही कार्यकाळ येथील खलसे गुरुजी यांच्या मळ्यात घालविला होता. त्यांच्याबाबत अनेक चमत्कारीक आख्यायिका गावकरी आजही सांगतात. त्यामुळे त्यांना मानणारा मोठा भक्त परिवार परिसरात आहे.






हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# सुखापुरी मंडळात बिबट्याचा वावर शेतकऱ्यांनी व ऊसतोड मजुरांनी कामे करतांनी सावधानता बाळगावी - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात सध्या सर्वत्र ऊसतोडीचा हंगाम सुरू झाला आहे. जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील सुखापूरी मंडळात बिबट्याचा वावर असल्याचे वन विभागाच्या रेस्क्यू टीमने जायमोक्यावर जाऊन स्थळ पाहणी केल्यानंतर लक्षात आले आहे. तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी व ऊसतोड मजुरांनी शेतातील कामे करतांनी सावधानता बाळगावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

अंबड तालुक्यातील सुखापुरी मंडळात मंगळवार दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी मौजे पिठोरी सिरसगाव शिवारात शेतकऱ्यांना बिबट वन्य प्राणी दिसला असल्याच्या माहितीवरुन वन विभागाच्या रेस्क्यू टीमने जायमोक्यावर जाऊन पाहणी केली. या पाहणी दरम्यान बिबटचा या परिसरात वावर असल्याचे दिसून आले. हा वन्य प्राणी या भागात साधारण १० किलोमिटरच्या परिघात वावरत असून सदर क्षेत्रात प्रामुख्याने ऊसाचे पीक दिसून आले आहे. सध्या ऊसतोडीचा हंगाम चालु असल्याने बिबट प्राणी शेतकऱ्यांना दिसून येत आहे. सुखापुरी मंडळात सुखापुरी, वडीकाळ्या, एकनाथ नगर, वडीगोद्री, पिठोरी सिरसगाव, कारंजळा या गावांचा समावेश आहे. तरी या गावातील ग्रामस्थ, शेतकरी व ऊसतोड करणाऱ्या मजुरांमध्ये वन्यजीव बचाव टीमकडून वन्य प्राणी बिबटबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

ऊसतोडणी किंवा शेतीची कामे करताना शक्यतो समुहाने कामे करावीत. एकट्या व्यक्तीने ऊसतोड किंवा शेतीची कामे करू नयेत. बिबट आढळुन आल्याने ऊसतोडणी सुरु असताना शेतकऱ्यांनी व मजुरांनी आपल्या लहान मुलांना सुरक्षित ठिकाणी ठेवावे. गावाजवळ, शेतात किंवा गावठाण हद्दीत बिबट दिसल्यास बघण्यासाठी गर्दी करू नये. त्यांना दगड मारून पळविण्याचा किंवा मोबाईलवर फोटो काढण्याचा प्रयत्न करू नये. जिल्ह्यात बिबट किंवा त्याची पिल्ले आढळल्यास तात्काळ संबंधित वन विभागाचे वनपरीक्षेत्र अधिकारी विजय दौंड (मो.८२६२०७८८८६), वनपरिमंडळ अधिकारी बी.एम.पाटील (मो.९७३०४१४२८७) आणि वनरक्षक कैलास कदम (मो.९७३०१३१४९८) यांच्या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधून माहिती द्यावी. असेही आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

**वन विभागाकडून जनजागृती**

उंदीर, पक्षी, सरपटणारे प्राणी, डुकरे आणि कुत्रे हे बिबट्याचे खाद्य आहे. प्रत्येक बिबट्याला पोकळ ठिपक्यांची विशिष्ट रचना असते. त्यामुळे गावाजवळीत शेतात बिबट आल्यास त्याला बघण्यासाठी गर्दी करु नये, दगड मारुन त्याला पळविण्याचा प्रयत्न करु नये, पहाटे व सायंकाळी अंधारात गावाबाहेर व शेतात जाण्याचे काही काळ टाळावे, बिबट दिसताच जवळच्या




वनरक्षक व चौकीदाराला कॉलकरुन माहिती द्यावी. पाळीव प्राण्यांना बंदिस्त आणि सुरक्षित ठिकाणी ठेवावे. अचानक बिबट जवळ दिसल्यास शांत राहण्याचा प्रयत्न करा. बिबट्याला त्यांच्या मार्गाने जावू द्या, त्याला डिवचण्याचा प्रयत्न कदापी करु नका आणि तात्काळ वन विभागाला १९२६ या क्रमांकावर संपर्क साधावा. याप्रमाणे अंबड तालुक्यातील सुखापुरी मंडळामधील गावागावात जनजागृती करण्यात येत आहे. यामध्ये वन विभागाचे सहायक वनसंरक्षक सुदाम मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरीक्षेत्र अधिकारी विजय दौंड, वनपरिमंडळ अधिकारी बी.एम.पाटील, वनरक्षक कैलास कदम, श्री.शिंगणे, श्री.मिटके, श्रीमती जाधव, श्रीमती फड यांचा सम ावेश आहे.


## आरोग्य विभाग



# जिल्हा परिषद, जालना

# डेंग्यू ताप प्रतिबंधासाठी

## जनतेस आवाहन

❐ डेंग्यू रोगाचा प्रसार एडीस इजिप्ती नावाच्या डासांमार्फत होतो.

❐ एडीस इजिप्ती डासाची उत्पती रांजण, माठ, हौद, टाक्या या मधील स्वच्छ साठवलेल्या पाण्यात व कुलर मधील पाणी, छतावरील साचलेले पाणी, परिसरातील रिकाम्या बॉटल्स्, नारळाच्या करवंट्या, निकामी टावर्स इ. मध्ये होते.

## रोग लक्षणे

**ताप डोकेदुखी, मळमळ, उलट्या, सांधे दुखी, अंगावर पुरळ येणे, अंग दुखी इ. लक्षणे डेंग्यू रुग्णात आढळतात.**

**डेंग्यू तापाचा प्रसार रोखण्यासाठी खालील उपाय योजना राबवाव्यात.**

● दर शनिवारी कोरडा दिवस पाळावा, या दिवशी घरातील सर्व पाणी साठे रिकामे करुन त्याच्या आतील बाजू व तळपासून पुसून स्वच्छ करुन कोरडे करावेत.

● पाणी साठ्यांचे साधने नियमितपणे पूर्ण झाकून ठेवावेत.

● साचलेल्या नाल्या, डबके वाहते करावे व वाहत्या न करता येणाऱ्या पाण्यात ऑईल, रॉकेल टाकावे.

● कोरडे करता न येणाऱ्या व डास आळ्या असलेल्या पाणी साठ्यात आरोग्य कर्मचाऱ्यांकडून अॅबट टाकुन घ्यावे.

● आवश्यक ठिकाणी आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत गप्पीमासे सोडावेत.

● खिडक्यांना जाळीदार पडदे बसवावेत, डास प्रतिबंधात्मक साधनांचा व मच्छरदानीचा वापर करावा.

● डासांचा संपर्क टाळण्यासाठी दार खिडक्या सायंकाळी बंद ठेवाव्यात.

● घर व घराच्या शेजारील परिसर स्वच्छ ठेवावा.

● गावातील, परिसरातील व घरा शेजारील गाजर गवत नष्ट करुन परिसर स्वच्छ ठेवावा.

● शौचालयाच्या व्हेंट पाईपला जाळ्या बसवून घ्याव्यात.

● ताप आल्यास नजिकच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, सरकारी दवाखाने, आरोग्य कर्मचारी यांच्याशी संपर्क साधवा,

**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, जालना.**


# लालबाग येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

## राष्ट्रीय एकता ग्रुपच्या उपक्रमातून नागरिकांना लाभ



**जालना । प्रतिनिधी -** सामाजिक बांधिलकी जपत राष्ट्रीय एकता ग्रूप तर्फे लालबाग (खांडसरी) परिसरात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात परिसरातील अनेक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपली तपासणी करून घेतली.

शिबिराचे उद्घाटन करताना लियाकत अली खान यांनी आरोग्य जनजागृतीचे महत्त्व पटवून दिले आणि सुदृढ सम ाजासाठी नियमित आरोग्य तपासणी हीच खरी सुरक्षा असे प्रतिपादन केले. यानंतर डॉ. झीशान, डॉ. शिफा इनाझ, डॉ. फेरोज, डॉ. लतीफ, डॉ. काशिफ, डॉ. इश्तियाक आणि राहुल लिहीनार यांनी नागरिकांची तपासणी करून योग्य मार्गदर्शन केले. तपासणीनंतर गरजू नागरिकांना मोफत औषधे वाटण्यात आली. या उपक्रमासाठी जिल्हा रुग्णालय जालना व आरोग्य सेवा कार्यालय यांच्या वतीने डॉक्टर, औषधे आणि रुग्णवाहिका (Ambulance) ची सुविधा पुरविण्यात आली होती. शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय एकता ग्रूपचे शेख अब्दुल्ला जालनावी, अब्दुल करीम, आसिफ खान, शेख रियाज, इलियास खान, फुलचंद लामकाने, जावेद तांबोळी तसेच लालबाग परिसरातील शेख फेरोज (पत्रकार), शेख अनीस, अब्दुल रशीद, सैफान शेख आणि शेख आदिल यांनी मोलाचे योगदान दिले.

शिबिरादरम्यान अनेक नागरिकांनी रक्तदाब, मधुमेह, नेत्र तपासणी, सर्वसाधारण आरोग्य तपासणी करून घेतली. या माध्यमातून राष्ट्रीय एकता ग्रूपने सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवीत आरोग्यविषयक जागरूकतेचा संदेश दिला. नागरिकांनी या शिबिराच्या माध्यमातून आरोग्य तपासणी व सल्लाम सलत मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

राष्ट्रीय एकता ग्रूपचे शेख अब्दुल्ला जालनावी यांनी सांगितले की, गरिब व वंचित घटकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवणे हेच आमचे ध्येय आहे. जिल्हा रुग्णालयाच्या सहकार्याने हे शिबिर यशस्वी झाले असून लवकरच शहरातील इतर भागातही असे शिबिरे आयोजित करण्याचा मानस आहे.

# शेतकऱ्यांसाठी पीक स्पर्धेचे आयोजन

**जालना -** पीक स्पर्धा सन २०२५ - २६ राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविधभागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती मनोबलामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने व नवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन दरवर्षी राज्यांतर्गत पिकस्पर्धा योजना राबविण्यात येते. अन्नधान्य,कडधान्य व गळीतधान्य पीकस्पर्धा सन २०२५-२६ साठी राज्यस्तरावरून कृषी विभागामार्फत पीक स्पर्धा जाहीर करण्यात आल्या असून त्याच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना कृषी विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. अर्ज करण्याची अंतिम दिनांक दि. ३१ डिसेंबर असल्याचे कृषी विभागाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# विक्रम लोंढे प्रकरणात निष्पक्ष चौकशी व आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी

## सकल मातंग समाजाचा आक्रोश मोर्चा; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन







**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील सकल मातंग समाज तर्फे जिल्हाधिकारी कार्यालयात आज मंगळवार (दि ११) रोजी एक महत्त्वपूर्ण निवेदन सादर करण्यात आले. विक्रम लोंढे या तरुणाच्या हत्येच्या प्रकरणी निष्पक्ष चौकशी करून आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली. प्रसंगी आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. हा आक्रोश मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून गांधीचमन, कचेरी रोड, उड्डाण पुल, नुतन वसाहत येथे या आक्रोश मोर्चाचे सभेत रुपांतर झाले. यावेळी अध्यक्ष श्रीकृष्णा पांडव, अशोक साबळे, निखील पगारे, संदीप खरात, सुनील रत्नपारखे, दाविक गायकवाड, राम सुतार, पिटर खंदारे, अर्जुन धाकतोड, विक्की हिवाळे, सचिन घोडे, सचिन लोंढे, शाम सराटे, संतोष निकाळजे यांच्यासह समाजातील अनेक पदाधिकारी व सदस्यांनी मोर्चात सहभागी झाले होते. घटनेच्या न्याय्य तपासासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांच्यावतीने तहसिलदार छाया पवार यांनी निवेदन स्विकारले.

जालना जिल्ह्यातील विक्रम लोंढे या युवकाचा मृत्यू अत्यंत संशयास्पद परिस्थितीत झाला. समाजाच्या म्हणण्यानुसार, ही घटना केवळ अपघात नसून नियोजित हत्या आहे. या प्रकरणात निष्पक्ष न्यायालयीन तपास व्हावा आणि आरोपींना कठोर शिक्षा मिळावी, यासाठी समाज एकवटला आहे.

समाजाच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, घटनेचा तपास एसआयटी (विशेष तपास पथक) स्थापन करून करण्यात यावा. प्रकरणातील गुन्हेगारांना तात्काळ अटक करून न्यायालयीन चौकशी सुरू करावी. प्रकरणातील विलंब टाळण्यासाठी प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे.

या निवेदनात केवळ विक्रम लोंढे प्रकरणच नव्हे, तर मातंग समाजाशी संबंधित विविध सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक प्रश्नांवरही मागण्या मांडण्यात आल्या आहेत. त्यात प्रमुखत जालना जिल्ह्यातील मातंग समाजासाठी सामाजिक सभागृह व समाज मंदिर उभारणीसाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी. जिल्ह्यातील गरजू मातंग समाजातील विद्यार्थ्यांसाठी ५० लाख रुपयांचा शैक्षणिक निधी स्थापन करण्यात यावा. मातंग समाजातील युवकांना सरकारी योजनांमधून प्राधान्याने रोजगार व प्रशिक्षणाच्या संधी द्याव्यात. समाजावर अन्याय किंवा अत्याचार करणाऱ्यांविरुद्ध तात्काळ कारवाई व्हावी आणि अशा घटनांना रोखण्यासाठी विशेष अधिकारी नेमावा. सामाजिक न्याय विभाग आणि जिल्हा प्रशासन यांनी मिळून जागृती अभियान राबवावे.

आक्रोश मोर्चाच्या माध्यमातून मातंग समाजातील लोकांनी व्यक्त केलेल्या भावना तीव्र आणि वेदनादायक होत्या. उपस्थित समाजबंधूंनी विक्रमला न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरू राहील अशी घोषणा दिली. समाजातील महिलांनी आणि युवकांनीही प्रशासनाने वेळीच योग्य कारवाई न केल्याबद्दल असंतोष व्यक्त केला.

निवेदन स्वीकारून पुढील कार्यवाहीसाठी ते संबंधित विभागांकडे पाठविण्याची प्रक्रिया सुरू केली असल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणाची चौकशी निष्पक्ष होऊन दोषींना शिक्षा होणे हेच समाजाचे अंतिम ध्येय असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

या घटनेत केवळ एका व्यक्तीचा मृत्यू नाही, तर समाजाच्या विश्वासाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. मातंग समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाने तात्काळ आणि पारदर्शक पावले उचलली नाहीत तर याचा व्यापक सामाजिक परिणाम होऊ शकतो. विक्रम लोंढे प्रकरण हे ग्रामीण महाराष्ट्रातील दलित तरुणांवरील अत्याचारांविरुद्धचा प्रतीकात्मक संघर्ष ठरत आहे. अशा प्रकरणांत वेगवान न्याय आणि संवेदनशील दृष्टी आवश्यक आहे.

### जालना शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५

# प्रभाग आरक्षण सोडत जाहीर

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ संदर्भात प्रभागनिहाय आरक्षण सोडत आज दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात मा. जिल्हाधिकारी तथा आयुक्त व प्रशासक आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

या प्रसंगी मा. राज्य निवडणूक आयोगामार्फत मान्यता प्राप्त अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग यांचे आरक्षण वाचन करून दाखविण्यात आले. तसेच शासनाचे व राज्य निवडणूक आयोगाचे आरक्षणासंबंधी मार्गदर्शक आदेश वाचून दाखविण्यात आले. त्यानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) या प्रवर्गांकरिता आरक्षणाची सोडत काढण्यात आली. सर्वसाधारण (महिला) आरक्षण राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निश्चित करण्यात आले.



सदर सोडत नुतनवसाहत शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते आरक्षण चिठ्ठ्या काढण्यात आल्या. त्यानुसार आरक्षणाचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत अनुसूचित जाती (ड्ड) राखीव प्रभाग: १अ, २अ, ३अ, ४अ, १२अ, १४अ, १५अ, १६अ

अनुसूचित जाती महिला राखीव प्रभाग : २अ, ४अ, १४अ, १५अ

अनुसूचित जमाती (ड्ढ) महिला राखीव प्रभाग : ३ब

नागरिकांचा मागास प्रवर्ग (इउउ) राखीव प्रभाग : १ब, १क, २ब, ३क, ४ब, ५अ, ६अ, ७अ, ८अ, ९अ, १०अ, ११अ, १२ब, १३अ, १४ब, १५ब, १६ब

नागरिकांचा मागास प्रवर्ग (इउउ) महिला राखीव प्रभाग : १ब, २ब, ६अ, ७अ, ८अ, ९अ, १२ब, १३अ, १६ब

सर्वसाधारण महिला राखीव प्रभाग : १ड, १ड़, ३ड, ४क, ५ब, ५क, ६ब, ७ब, ८ब, ९ब, १०ब, १०क, ११ब, ११क, १२क, १३ब, १४क, १५क, १६क

सर्वसाधारण प्रभाग: २क, २ड, ४ड, ५ड, ६क, ६ड, ७क, ७ड, ८क, ८ड, ९क, ९ड, १०ड, ११ड, १२ड, १३क, १३ड, १४ड, १५ड, १६ड

वरीलप्रमाणे जालना शहर महानगरपालिकेचे आरक्षण सोडतीद्वारे निश्चित करण्यात आले आहे. या प्रसंगी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, उपायुक्त नंदा गायकवाड, सहायक आयुक्त अर्पणा जाधव, केशव कानपुडे, निवडणूक कक्ष प्रमुख गणेश बत्तीन, राजेश चंदनशिवे, आनंद मोहिदे, प्रमोद वाघमारे तसेच महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सदर आरक्षणाची अधिकृत प्रसिद्धी दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात येणार असून दि. १७ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत हरकती व सूचना महानगरपालिकेच्या कार्यालयात सादर करता येतील. प्राप्त हरकती व सुचनांवर दि. २५ नोव्हेंबर ते ०१ डिसेंबर २०२५ या कालावधीत विचार करून निर्णय घेण्यात येईल. अंतिम आरक्षण प्रसिद्धी दि. ०२ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात येणार आहे.

# तेजलची भारतासाठी एशिया कप स्टेज-३, जेद्दासाठी निवड

### कालिका स्टीलच्या प्रायोजकत्वाखाली तेजलची उल्लेखनीय कामगिरी

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राला अभिमानाचा क्षण लाभला आहे. कालिका स्टीलच्या प्रायोजकत्वाखाली सराव करणारी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची विद्यार्थीनी तेजल हिची निवड एशिया कप स्टेज-३ (Asia Cup Stage 3) स्पर्धेसाठी भारताकडून करण्यात आली आहे. ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा ९ ते १५ डिसेंबर २०२५ दरम्यान जेद्दा, सौदी अरेबिया येथे पार पडणार आहे.



**सोनिपतमधील निवड चाचणीत पहिला क्रमांक**

एशिया कपसाठी झालेली निवड चाचणी सोनीपत, हरियाणा येथे पार पडली. देशभरातील ४५ सर्वोत्तम महिला धनुर्धारी (Archers) या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. या चाचणीत तेजलने आपल्या अचूक लक्ष्यबाणांनी सर्वांना मागे टाकत पहिल्या क्रमांकाने भारतासाठी स्थान निश्चित केले.

**सुवर्णपदकाची दमदार कामगिरी**

अलीकडेच झालेल्या ll India Inter-University Archery Championship 2025 मध्ये तेजलने पुन्हा एकदा आपली क्षमता सिद्ध केली. तिने Dr. Babasaheb mbedkar Marathwada University, छत्रपती संभाजीनगर तर्फे स्पर्धेत भाग घेत, ३५१ पैकी ३६० गुण मिळवत वैयक्तिक सुवर्णपदक पटकावले. यासोबतच मिश्र संघ स्पर्धेतही तेजलने कांस्य पदक जिंकत दुहेरी यशाची नोंद केली.

**विद्यापीठाचा अभिमान**

तेजलच्या या कामगिरीमुळे मराठवाडा विद्यापीठाला कंपाउंड आर्चरीमध्ये प्रथमच वैयक्तिक सुवर्णपदक मिळाले आहे. क्रीडा क्षेत्रातील ही कामगिरी विद्यापीठाच्या इतिहासात विशेष ठरणारी आहे.

**कालिका स्टीलचा गौरव**

कालिका स्टीलने सदैव उद्योन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन व पाठबळ देण्याची परंपरा कायम ठेवली आहे. तेजलच्या या आंतरराष्ट्रीय निवडीबद्दल कालिका स्टील परिवाराने अभिमान व्यक्त करत तिचा गौरव सत्कार करण्याची घोषणा केली आहे.

संस्थेच्या प्रतिनिधींनी सांगितले की, तेजलसारख्या मेहनती, लक्षवेधी आणि प्रतिभावान खेळाडूंच्या पाठीशी उभे राहणे ही आमच्यासाठी गौरवाची गोष्ट आहे. भारतासाठी तिची निवड हा संपूर्ण मराठवाड्याचा अभिमान आहे.

आता तेजल ९ ते १५ डिसेंबर दरम्यान जेद्दा (सौदी अरेबिया) येथे होणाऱ्या एशिया कप स्टेज ३ मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. या स्पर्धेत आशियातील १५ पेक्षा अधिक देशांचे प्रतिनिधी सहभागी होतील. तेजलच्या सुवर्णयशाची अपेक्षा संपूर्ण मराठवाडा आणि जालना जिल्हा करत आहे.